सहकारी सूतगिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड करण्याबाबत- श्री मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणी मर्या. शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जिल्हा लातूर.

महाराष्ट्र शासन

वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक : क्र. सूतगि ३३२६/प्र.क्र.३६/टेक्स-१(ब)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १८ नोव्हेंबर, २०२६

वाचा:-

१. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सूतगि १११७/प्र.क्र.१९३/टेक्स १, दिनांक : २४ मार्च, १९९९.

२. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः सूतगि ३३१६/प्र.क्र.८१/टेक्स१(अ), दिनांक : १० जुलै, २०१७ .

३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकःसूतगि३३१५/प्र.क्र.७८/टेक्स१(अ), दिनांक : २० जानेवारी, २०१८ .

४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकःबैठक १५१६/प्र.क्र.६०/टेतस १ (अ), दिनांक : २० जुलै, २०१८.

५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग क्रमांक: प्रकल्प-१२१५/प्र.क्र.५०/टेक्स १(अ), दिनांक १७.०६.२०२१.

६. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग क्रमांक : सूतगि-३३२१/प्र.क्र.४१/टेक्स-१(ब), दिनांक ३०.०७.२०२१.

७. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः धोरण-२०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दिनांक ०२.०६.२०२३.

८. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्रमांकः सूतगी-२०२४/प्र.क्र.२०३/ योजना-२, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४.

९. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्रमांकः सूतगी-२०२०/प्र.क्र.७३/ शिक्षण-२, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४.

१०. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्रमांकः सूतगी-२०२४/प्र.क्र.२११/ योजना-२, दिनांक २२ जानेवारी, २०२५.

११. शासन निर्णय वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः प्रकल्प-१२२६/प्र.क्र.२८/टेक्स-१(अ), दिनांक १२.१०.२०२६.

<u>प्रस्तावना</u> :-

शासन निर्णय दि.०२.०६.२०२३ अन्वये राज्याच्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ ला मान्यता देण्यात आली आहे. यानुसार एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण आणि त्यातील सर्व संबंधित योजना हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या तारखेपासून कार्यान्वित होईल व दि.३१.०३.२०२८ पर्यंत वैध राहील असे नमूद आहे. सदर धोरणामध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राचा विकास आणि वस्त्रोद्योगासाठी निविष्ठांची उपलब्धता याच्या आधारावर महाराष्ट्राला या धोरणांतर्गत चार विविध

झोन मध्ये विभागण्यात आलेले आहे. या धोरणांतर्गत नवीन सहकारी सूतगिरण्यांसाठी सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांकडून घेण्यात येणारे कर्ज यांचे गुणोत्तर झोननिहाय वेगवेगळे आहे.

राज्यातील भटक्या विमुक्त जमाती (धनगर) प्रवर्गातील सहकारी सूतगिरण्यांना दि.०३.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारे ५:४५:५० या गुणोत्तरानुसार शासकीय भागभांडवल प्रदान केले जाते. तसेच दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दीर्घ मुदती कर्जही इतर मागास व बहुजन कल्याण विभागाद्वारे प्रदान केले जाते. तसेच राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या सहकारी सूतगिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड करणे व त्याअंतर्गत राज्यातील भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवल मंजूर करणे हा विषय वस्त्रोद्योग विभागाकडे दि.२२.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यानुसार श्री. मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणी मर्या., शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर या भटक्या विमुक्त जमाती प्रवर्गातील सहकारी सूतगिरणीची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत दि.२७.१०.२०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

शासन निर्णय दि.०२.०६.२०२३ अन्वये राज्यात कार्यान्वित करण्यात आलेल्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मधील तसेच इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार श्री. मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणी मर्या., शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर या भटक्या विमुक्त जमाती प्रवर्ग सूतगिरणीची ०५:४५:५० (सभासद भाग़भांडवल : शासकीय भागभांडवल : दीर्घ मुदती कर्ज) या अर्थसहायाच्या गुणोत्तरानुसार निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या सूतगिरणीचा प्रकल्प अहवाल शासन निर्णय दि.१२.१०.२०२६ अन्वये निश्चित केलेल्या रु.११८००.०० लाख इतक्या प्रकल्प अहवाल किंमतीच्या मर्यादेत या सूतगिरणी त्या त्या बाबींसाठी मंजूर कमाल मर्यादेपेक्षा जास्त होणारा खर्च गिरणी स्वनिधी उभारुन करेल या अटीवर सदर सूतगिरणीच्या ०५:४५:५० या आकृतीबंधानुसार रु.११८००.०० लाख इतक्या प्रकल्प किंमतीस खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून त्याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर सूतगिरणीचे सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल व दीर्घ मुदती कर्ज यांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील:-

अ.क्र.	तपशील	प्रकल्प किंमतीनुसार उभारावयाची रक्कम(रू. लाखात)
१	सभासद भागभांडवल ५%	५९०.००
२	शासकीय भागभांडवल ४५%	५३१०.००
३	दिर्घ मुदती कर्ज ५०%	५९००.००
	एकूण	**११८००.००**

४. या सूतगिरणीचा प्रकल्प किंमतीचा बाबनिहाय तरतुदीचा तपशील खालीलप्रमाणे राहील व त्यामर्यादेत या सूतगिरणीने खर्च करणे सूतगिरणीस बंधनकारक राहील.

अ.क्र.	तपशील	प्रकल्प अहवालाप्रमाणे मंजूर खर्च (रु.लाखात)
१	२	३
१	जमीन व जमीन सुधारणा	३१५.५९
२	फॅक्टरी इमारत	२५६५.२७
३	यंत्रसामुग्री	५९९८.०३
४	इतर कायम मालमत्ता	११६२.०५
५	स्टोअर्स व स्पेअर्स	११२.३५
६	उत्पादन पूर्व खर्च	५८०.०५
७	कॉन्टीजंसी	४८६.२७
८	खेळते भांडवल	५८०.३८
	एकूण	**११८००.००**

५. सूतगिरणीवर खालील बाबी बंधनकारक असतील-:

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २४ मार्च, १९९९, दिनांक दि.१० जुलै, २०१७, दि.२० जानेवारी, २०१८, दि.१७.०६.२०२१, दिनांक ३०.०७.२०२१ व दिनांक ०२.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयां मधील अटी व शर्ती तसेच भविष्यात वेळोवेळी शासनाकडून करण्यात येणाऱ्या सुधारणा व नव्याने अंतर्भूत होणाऱ्या अटी व शर्ती या सूतगिरणीवर बंधनकारक राहतील. तसेच प्रत्येक टप्प्यावर सूतगिरणीने आवश्यक असणाऱ्या सर्व मंजुरी / मान्यता घेणे बंधनकारक आहे. तसेच सदर सूतगिरणीवर इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या शासन निर्णयां मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

२) सदर सहकारी सूतगिरणीचे भविष्यात आंतरराज्यीय रुपांतरण करावयाचे असल्यास शासनाची पूर्ण देणी एकरकमी दिल्यानंतरच तशी परवानगी देण्यात येईल.

३) सहकारी सूतगिरणीच्या कार्यक्षेत्रात वाढ करावयाची झाल्यास सूतगिरणीचे स्थलांतर होणार नाही.

४) सहकारी सूतगिरणीच्या सध्या अस्तित्वात असणाऱ्या कार्यक्षेत्रातील व नव्याने वाढणाऱ्या कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांचे आधारकार्ड सूतगिरणीच्या सभासदत्वाशी जोडणे (लिंक करणे) बंधनकारक असेल.

५) सूतगिरणीच्या कामासाठी कालबध्द कार्यक्रम (Time bound Program) आखून घ्यावा व त्यानुसार सूतगिरणीची उभारणी विहित कालावधीत करावी.

६) शासन निर्णय दि.२४.३.१९९९ मधील सूतगिरणी परतफेडीस पात्र होण्याबाबतच्या अटीमध्ये दि.१०.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून सदरची सुधारणा या सूतगिरणीसाठी बंधनकारक राहील.

७) सूतगिरणीस निधी उभा करण्यासाठी कोणती बँक कर्ज देणार आहे, त्या बँकेचे कर्ज मंजूर करण्यात येत असल्याबाबतचे पत्र सादर करावे.

८) सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतचा तिमाही प्रगती अहवाल आयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

९) सूतगिरणीचा प्रकल्प एक पथदर्शक प्रकल्प म्हणून उभा राहील याबाबत सूतगिरणीने तसेच आयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर यांनी दक्षता घ्यावी.

१०) दि.१७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या राजपत्रान्वये राज्यातील सहकारी संस्थांवर दोन शासकीय सदस्य नेमण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सुधारणा करण्यात आली असून सदर निर्णय या सूतगिरणीस बंधनकारक राहील.

६. सूतगिरणीने रु.११८००.०० लाख इतक्या किंमतीमध्ये प्रकल्पाची उभारणी पूर्ण करावी. शासनाकडून देय भागभांडवलाची रक्कम निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वरीलप्रमाणे त्या त्या प्रयोजनासाठी मंजूर किंमतीपेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास जास्तीची रक्कम सूतगिरणीने स्वनिधीतून उभी करणे आवश्यक राहील. प्रकल्पावर अतिरिक्त होणारा खर्च सूतगिरणीला स्वतः करावा लागेल. तसेच यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामासाठी शासन निर्णय दि.१५.०६.२००६ व दि.२८.०३.२०१८ नुसार मान्यता घ्यावी. सूतगिरणीच्या संचालक मंडळाने सूतगिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

७. सदर शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २७.१०.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१११८१२३६५९२९३६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.11.18 12:38:25 +05'30'

(श्रीकृष्ण पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अ. मु.स, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शा) यांचे यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८) प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, छत्रपती संभाजीनगर.
९) जिल्हाधिकारी, लातूर.
१०) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई.
१२) महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर.
१३) नियोजन विभाग (कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई.
१४) वित्त विभाग (व्यय-२/१४), मंत्रालय, मुंबई.

१५) ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

१६) अध्यक्ष, श्री. मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणी मर्या., शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर.

१७) निवड नस्ती -टेक्स १ (ब).